# मधली पाने



**ग्रेस**

*आपल्या नावापासूनच कुतूहल निर्माण करणारे प्रा. माणिक गोडघाटे ऊर्फ ग्रेस यांच्या कविता सुरुवातीच्या काळात 'छंद' या मासिकातून प्रसिद्ध झाल्या. आणि वाचकांचे, विशेषतः तरुण वाचकांचे लक्ष या कवितांनी वेधून घेतले. त्यानंतर पॉप्युलरच्या 'नवे कवी : नवी कविता' ह्या मालिकेतून* ***संध्याकाळच्या कविता*** *हा त्यांचा पहिलाच संग्रह १९६७ साली प्रकाशित झाला. मराठी संतकविता, सूफी विचार, पाश्चात्त्य लेखन अशा अनेक स्रोतांनी श्रीमंत झालेली ही कविता रसिक वाचकांबरोबरच संगीतकारांना उद्दिपित करणारी ठरली. १९५५ पासून सुरू झालेला हा लेखनप्रवास आजतागायत समृद्धपणे सुरू आहे. 'ग्रेस' या काहीशा अनोख्या गूढ नावामुळे त्यांच्या काव्यलेखनाविषयी वाचकांमध्ये, समीक्षकांमध्ये कुतूहल निर्माण झाले होते. काही मजेशीर किस्सेही याबाबत सांगितले जातात.* ***संध्याकाळच्या कविता*** *नंतर* ***राजपुत्र आणि डार्लिंग, चंद्रमाधवीचे प्रदेश, सांध्यपर्वातील वैष्णवी, सांजभयाच्या साजणी*** *या कवितासंग्रहांनी सर्वसामान्य रसिक माणसांचे लक्ष वेधून घेतले. त्यांचा असा खास वाचकवर्ग तयार झाला आणि उत्तरोत्तर त्यात वाढच होत गेली. 'समजत नाहीत, दुर्बोध आहेत,' असा एक सूर या कवितांच्या बाबतीत निघत असला तरी त्यांच्या लेखनाची मोहिनी, ताजेपणा अद्याप कमी झालेला नाही. आत्मपर आशय असलेले आणि तरीही भावमधुर-काव्याची प्रचीती आणून देणारे* ***चर्चबेल, मितवा, संध्यामग्न पुरुषाची लक्षणे*** *आणि* ***मृगजळाचे बांधकाम*** *ह्या ललितबंधांतून ग्रेसांच्या काव्यातील आशयघन दुर्बोधता सुबोध होऊन जाते. हे ललितलेखन कवितेइतकेच लोभस आहे. वरवर पाहता हे ललितबंध असले तरी लेखकाच्या वैयक्तिक आयुष्यातील त्याचे स्वतःचे त्याच्या आत्म्यावर झालेल्या आंदोलनांचे प्रतिबिंब आहे हे जाणवते. याचाच प्रत्यय लवकरच प्रकाशित होत असलेल्या* ***वाऱ्याने हलते रान...*** *या ललितसंग्रहातून येईल. ग्रेसांचे प्रत्येक पुस्तक म्हणजे प्रतिभेचे एकेक सुंदर लेणे!* ***संध्याकाळच्या कवितां****पासून* ***वाऱ्याने हलते रान*** *पर्यंतचा ग्रेसांचा अखंड सहवास पॉप्युलरला लाभला आहे. त्यांची पुस्तके मांडणी, मुखपृष्ठ, रचना, बांधणी, छपाई यांची एक उत्तम उदाहरणे ठरली आहे. आणि चाहत्यांसाठी आनंदाची पर्वणी!*

## वाऱ्याने हलते रान

### मृगजळातील देवचाफ्याचे अधांतर

पुण्यात नव्याने घर उभारण्याची कल्पना काही कारणाने माझ्या मनात उभी झाली आणि मी थोडासा दचकलो. कुठलीही कल्पना ज्या वेळी माझ्या डोक्यात प्रवेश करते त्या वेळी तिचे काही काळात संकल्पनेत जर रूपांतर झाले नाही तर ती कल्पना एक तर तशीच विरून जाते, नाही तर नको असलेल्या उदासीचे सल माझ्यामागे लावून जाते. संकल्पना हे माझ्या जीवनव्यवहाराचे आणि निर्मिति व्यवहाराचे व्यवच्छेदक लक्षण आहे, हे आता जणू काही ठरून गेल्यासारखेच आहे. दुसरी गोष्ट अशी की, एकदा काही वर्षांपूर्वी मित्रमंडळींच्या आग्रहाने पुण्यात मी आणि जी.ए. यांना एकत्र शेजारी, शेजारी फ्लॅटमध्ये बंदिस्त करण्याचा चंग बांधला होता. सुरुवातीला आम्ही दोघांनीही उत्साहाने मित्रमंडळींची ही रसाळ भातुकली शिरोधार्य मानली होती. पण जी.ए. या भातुकलीच्या तळाशी असलेली काजळमाया लखलखीतपणे आत्मसात करून, सौम्य नकाराने मित्रमंडळींचा हा तीव्र बंदिस्त बेत हाणून, बाजूला झालेच. पण मी अडकलेला पाहताच त्यांनी मला पत्रातून कळविले– 'ग्रेस, शेवटी तुम्ही, गच्चीवरील गप्पा आणि तळघरातील मसलती करणाऱ्या पुण्यात घर केलेच ना?' जी.एं.चा प्रतिभापूरित आदेश माझ्याही मेंदूत भिनला आणि पुण्याची घरमांडणीची भातुकली मीही मागोमाग उधळून लावलीच. त्याच पुण्यात घर उभारण्याची कल्पना, संकल्पना माझ्यात शिरली, ह्यातील संगती आणि विसंगती कशी मांडावी, या पेचात मी तूर्त अडकलो आहे.

विशिष्ट जमीन, विशिष्ट खंड, विशिष्ट भूगोल माणसाच्या देहबांधणीवर, हृदयबांधणीवर, खरेच नखशिखान्त परिणाम करतो काय? पुण्याचा भूगोल, भूखंड, निसर्ग, त्याच्या अवतीभोवती असलेले सह्याद्री या महाकाय पर्वतराजींचे उद्दीपन, उत्थापन ह्यांचा पुण्यातील माणसांवर झालेला परिणाम केवळ गच्चीवरील गप्पा आणि तळघरातील मसलती या दोनच दूषण वाक्यांनी हेरून, जी.ए. या भूप्रदेशावर थोडासा अन्यायच तर करीत नाहीत ना, अशी शंकाही माझ्या मनात येऊन गेली.

हेही जाऊ दे केशव! पुण्यात घरबांधणीची मला घरघर लागलेली आहे, या मागील रहस्यजालाचा हळवा तंतू, तू तर ओळखतोस? अरे, साऊलचे माहेर या पुण्यातच आहे ना! मग मी इथल्या पंथविरामातील सासुरवासाचे दुःख किती दिवस भोगणार? हळव्या, मधुर लज्जाकंपनांची सूक्ष्म लहर तुझ्या डोळ्यांभोवती फेर धरते, त्याने तुझे डोळे अधोगामी झाले आहेत! की जिवाला पेटवणारा उन्हाळा इथे आणताना थोडीशी सहिष्णुतेची चाहूल देणारे एखादे फूल, ओलसरपणाचा आधार देणारी एखादी सुन्न डहाळीही केशव, तुला इथे आणता आली नाही, त्याचे अपराधी दुःख तुला डोळे वर करू देत नाही.

*उन्हाच्या झळांनी जळे आंबराई*
*उडाले कुठे पोपटांचे थवे*
*तुझ्या पाजलेल्या दुधाच्या भराला*
*जसे आतडे वाळलेले हवे*

भराला म्हणजे बहराला. नवा बहर मिळवून देण्यासाठी किंवा बहरगुणांची नीतिमत्ता अबाधित राखण्यासाठी देवचाफ्याचे हुंकार झेलणाऱ्या उन्हाच्या झळांना पाजलेल्या दुधाच्या वाटीतून पुन्हा माझेच वाळलेले आतडे हवे आहे. उन्हाचा आकांत मृगजळाच्या टिंबथेंबांनी लहरणारे, भिरभिरणारे, तुटलेल्या दीप्तिमान आरशांचे खाचखळगे ह्यांनी सारा आसमंत भयभीत झालेला आहे.

आया-बायांना नेहमीच दुःख सजवताना, जडवताना, जोजवताना, फुलवताना आणि उलवतानाही सतत माहेरपणाची विरासत वापरण्याची मुभा आहे.

सारेच तत्त्वज्ञानातील पूर्णपुरुष, या प्रकृतिभेदाच्या मायाजालाला युगानुयुगे टक्कर देत आहेत. पण त्याने स्वतःला माहेरपणाची थोडीशीही बाधा जडू दिली नाही, हे केवढे आश्चर्य!

प्रकृतीच्या या मायाळू अन्यायाने विव्हळ झालेला हा पुरुष केवळ सासरचाच उद्घोषमंत्र सतत जपत राहतो. आणि माहेरवाशिणींच्या अनाघ्रात माहेरपणाची अखंड पालखी उन्हाळी झळांच्या रंगभेदांनी सजवीत राहतो. त्याच्या ललाटी वज्रलेप झालेल्या या भागदेहाचे सूत्र कसे आणि कधी उसवता येईल याचा साधा सुगावाही तो आपल्या मेंदूत शिरूच देत नाही. त्याने जर शिरू दिला तर माहेरपणाच्या असंख्य पालख्यांचे निनावी स्मशान त्याच्या अस्तित्वाला हादरे देऊ लागेल. पण येवढ्याने या पुरुषाच्या मेंदूतील चंद्रामृताच्या कुंडली शकुनाचा वेध पूर्ण होत नाही. साऊलच्या माहेरपणाचे माझ्या निर्मितीतील अधिष्ठान या प्रकृतिवादी पुरुषार्थासारखे तर नाही ना?

मी माझ्या तथाकथित निर्मितिसंकुलात जगत असताना, वावरत असताना, बांधणी तत्त्वांच्या मागे असलेली व्यवस्था कधीही भेदाने, वेधाने नेस्तनाबूत करण्याचा प्रयत्न केलेला नाही. मला काहीतरी, साऊलच्या लगबग चाहुलीतून निसटणारे तरंगतरल तत्त्व चिमटीत पकडून त्याला बोटांच्या अग्रबिंदूवर खेळवावेसे वाटते. त्याची संभावना मी अशी करतो केशव!

*त्वचेला झुगारून मेंदूत येतो*
*गळी दाटलेला सुखाचा दुवा*
*जसे नष्ट झाल्या जुन्या देऊळाला*
*निघाले कुणी घेऊनिया दिवा!*

पण तेवढ्यानेही असा भास होऊ शकतो की, मी या निर्मितिव्यवस्थेच्या मागील साऊलच्या माहेरपणाच्या आत्मतत्त्वालाच आग लावतो आहे.

*रानी वनी डोले जोगियाचा नाग,*
*त्याला अनुराग, म्हणू नये....*

त्यामुळे या छोट्या संहितेला ही माझी दुरुस्तीची चिमुकली पाकळी जोडून दिलीच पाहिजे.

Yes! I can understand conspiracies/conspirators, benefactors, obligating lovable friends; and Keshav! I can understand my thematical enemies, ominous, treacherous men and women around me, but my dear Keshav! Let me confess at this point, I never had a view to understand their codes of their behavior. आणि म्हणून केशव! देवचाफ्याच्या या उन्हाळी प्रतीक भासात मी ठामपणे म्हणू शकतो,

*उन्हाला दयेने किती भारलेले*
*तुझा देह सोन्याहुनी कोवळा*
*असे भास आभास काही कळेना*
*उभी घार की हा उभा कावळा*

कावळ्यावरचे सिंगापुरात उद्‌भवलेले अस्तित्वसंकट, यासंबंधी आपण केशव, कधीतरी सुखदुःखाची महापरंपरा खेळवणारी नवी भातुकली मांडूच मांडू. पण उन्हाच्या मृगजळासंदर्भात डोळ्यांच्या बाहुल्यांना सतत माहेरपणाची आठवण यावी, त्याप्रमाणे समोर घार उभी आहे की कावळा, याचा भयाण भास हृदयाचा प्रत्येक ठोका तपासून तपासून जायबंदी होतो.

उन्हाचे देदीप्यमान आरसे आणि त्यांत देवचाफ्याच्या भोवती सोन्याहून कोवळा असलेला साऊलचा देह! आणि त्याची ही मत्त मयूर गिरकी? हा लहरबंदिनीचा पेच कसा सोडवावा? दूरात, अत्यंत दूरात अशावेळी कोणत्या नक्षत्रांवरून पर्जन्यसूक्ताची एखादी माहेरवाशिणी हाक देवचाफ्यापर्यंत पोहचू शकेल काय?

लिलीची दोन्ही फुप्फुसे निकामी झाल्यामुळे, मिथिला, माधवी आणि राघव यांच्या बालपणाचे सर्व सार, अभिसार मीच सोडवीत होतो. थोरली मिथिला आणि धाकटी माधवी शाळांच्या दिशेने अभिमुख झाल्या की मग फक्त राघव आणि लिलीची जायबंदी फुप्फुसे एवढेच ऐवज घराच्या पडवीची पाठराखण करायचे. मी नसलो की तेवढ्या अंतरात शेजारची राघवची सखी, बावरी, जन्मांध. आपल्या वाटीतले तरंगते पाणी आंधळ्या स्पर्शाच्या अदमासाने राघवच्या पुढे धरायची. प्रत्यक्ष पाण्याचे दर्शन होण्यापेक्षा, पाण्याचा हाताला होणारा आंधळा निनावी भास, तिचे आंधळे निनावी स्वप्न राघवला डोळसपणे पाहण्याच्याशिवाय दुसरा पर्यायच नव्हता. आंधळ्या बावरीची पाण्याच्या मधोमध उभी असलेली डोळस सावली होऊन आपले बालपण जपणे एवढेच राघवच्या हातांत होते.

साऊलच्या प्राप्ती मोक्षाने या बालपणातील राघव-बावरीच्या सावल्यांचे अनंत खेळ मी आत्मसात करायला शिकलो. प्रत्येक छोटीमोठी सावली केशव, नाचते, बागडते, हुंदडते, लहरते, ती तंत्रतालावर तर नाहीच. अंधारातही जर सावल्यांनी आपले कारुण्य दाखविण्याचा आंधळा उन्मत्त प्रयत्न केलाच, तरी त्यांच्या तळपायाखाली कुठली ना कुठली उन्हाची तिरीप स्वस्तिकाची आकृती घेऊन सिद्ध झालेली असते. हे उन्हाचे पेटलेले वणवे पाहत असताना या सावल्यांचा कुठे मागमूसही लागत नाही. पण उन्हाचा हा दाह, उन्हाच्या या सर्वगामी कळा, प्रत्येक बिंदू बिंदूत, सावलीचा एकेक अत्तराचा थेंब, भोसकत असतात त्याचे काय? आणि सर्वंकष उन्हाच्या संदर्भातच सावल्यांची वीण घट्ट टाकली जाते आणि उन्हाच्या तरल सुईचे तीक्ष्ण टोक खुपसून तिच्या नक्षीच्या अनवट जागाही उसवल्या जातात. तृष्णा जर इतकी लख्ख असेल तर तिला पडणारी भूल सावळी कशी?

*कसे आठवावे नदी आटली की*
*पडे भूल तृष्णेहुनी सावळी*
*ताऱ्यांतला मंत्र उच्चारताना*
*पुन्हा धीट झाली तुझी सावली*

त्यात पुन्हा रवींद्रनाथांची ही सावलीबाईची भलावण करणारी कुरकूर ऐकू येतेच आहे.

I cast my own shadow upon my path because I have a lamp that has not been lighted.

आज राघव आपले बालपण मुठीत घेऊन उभा आहे. आणि काळाने त्याच्या छोट्या आकारबंधाचा पूर्णपुरुष, नखशिखांत तयार केला आहे. त्याच्या प्राक्तनाचे झळाळी ऊन त्याच्या अवतीभोवती पसरले आहे.

तो भयभीत झाला आहे. त्याच्या आत्म्याचे सर्व लामणदिवे, तेही दूरात दिसतात. पण ते केशवच्या डोळ्यांप्रमाणेच अधोमुख होऊन, अपराध-जाणिवेपाशी थांबलेले आहेत. कुठूनतरी पक्षिसंकेताची हूल उठावी त्याप्रमाणे बावरीच्या बाळवाटीतील पाण्यातून एखादी जन्मांध सावली आपल्या दिशेने येते आहे असा सत्याभास, राघव पकडण्याचा प्रयत्न करतो न करतो तोच मी त्याच्या दिशेने हंबरडा फोडून त्याला सांगतोय-

*राघवा! सावलीपाशी*
*कधी थांबू नये रे बाळा;*
*मृगजळी वाजवी ऊन*
*तृष्णेचा घुंगुरवाळा*

पुण्यातील घरबांधणीत, आणि जी.एं.नी हेरलेल्या पुण्याच्या स्वभावातील तळघरातल्या मसलती आणि गच्चीवरील गप्पा यांतून खरेच का साऊलच्या माहेरपणाची साद मला पडसाद घालते आहे?